Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | शुक्रवार
१९.०६.२०२६

# वरुड दर्पण

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: १३९ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२
संपादक - चंद्रकांत भा. भड
+91 7745067712

## सत्तेत वाटा वाढला की केंद्रात वाढीव मंत्रीपदही मिळणार

### 'ऑपरेशन टायगर' यशस्वी होताच उदय सामंतांच मोठं वक्तव्य

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** - दिल्लीमध्ये झालेल्या 'ऑपरेशन टायगर' अंतर्गत शिवसेना ठाकरे गटाचे ६ खासदार फुटल्यानंतर महाराष्ट्रातील राजकीय वातावरण कमालीचे तापले आहे.

या मोठ्या राजकीय भूकंपावर सत्तेत वाटा वाढला की केंद्रात वाढीव मंत्रीपदही मिळणार, 'ऑपरेशन टायगर' यशस्वी होताच शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि मंत्री उदय सामंत यांनी मोठं वक्तव्य करत एकंदरीत शिवसेनेच्या वाढलेल्या ताकदीबाबत भाष्य केलं आहे. सत्तेत वाटा वाढला की केंद्रात वाढीव मंत्रीपदही मिळणार, असं म्हणत 'ऑपरेशन टायगर' यशस्वी होताच उदय सामंत यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. एबीपी माझाच्या 'कॉफी विथ कौशिक' या विशेष कार्यक्रमात ते बोलत होते.

ऑपरेशन टायगरचे शिल्पकार इतर कुणी नाही, तर ऑपरेशन टायगर नक्कीच यशस्वी होईल. शिंदेंच्या नेतृत्वावर सगळ्याचा विश्वास आहे. काल ठाकरेंचे खासदार पोहोचले नाहीत म्हणजे ऑपरेशन टायगर यशस्वी आहे. आधी कोथळ्याची भाषा होती. आता तुडवा आहे. पण, ही भाषा चालत नाहीत. खासदार दिल्लीतच आहेत. असेही मंत्री उदय सामंत म्हणाले. ऑपरेशन टायगरचे शिल्पकार इतर कुणी नाही. तर ते सहा खासदारच आहेत आणि लवकरच घोषणा होणार आहे. त्यात अनेक बाबी लवकरच पुढे येणार आहे. कोथळा-तुडवा वगैरे कार्यकर्त्यांमधला उत्साह वाढण्यासाठी ठिक, पण याचा काहीही फायदा नाही खासदारांच्या सह्या नाहीत, वगैरे या वावड्या आहेत. पत्रकारांसमोर शिवीगाळ केली, पत्रकारांनाही सुपारी वगैरे बोलतात. अशांवर बोलणं चुकीचं आहे. कार्यकर्त्यांमधला उत्साह वाढण्यासाठी कोथळा-तुडवा वगैरे ठिक. पण याचा काहीही फायदा नाही.

२०२२ साली शिंदेंनी जेव्हा पुढाकार घेतला. तेव्हा आम्हाला दिलेले शब्द कधीही पुर्ण झाले नाही. एकनाथ शिंदे जेव्हा गेले, तेव्हा मी पक्षप्रमुखांना विनंती करत होतो की परत आणू शिंदे साहेबांना. नॅचरल अलायन्सकडे जावू. पण, काँग्रेसची साथ सोडण्याची तयारी नव्हती.

## नीट पुनर्परीक्षेपूर्वी टेलीग्राम वरील बंदी कायम

### दिल्ली उच्च न्यायालयाने याचिका फेटाळली

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**नवी दिल्ली** - २१ जून रोजी होणाऱ्या नीट २०२६ पुनर्परीक्षेपूर्वी पेपरफुटी रोखण्यासाठी टेलिग्रामवर २२ जूनपर्यंत घालण्यात आलेल्या तात्पुरत्या बंदीविरोधात कंपनीने दाखल केलेली याचिका दिल्ली उच्च न्यायालयाने शुक्रवारी (दि.१९) फेटाळली.

लाइव्ह लॉच्या वृत्तानुसार, न्यायमूर्ती तेजस करिया यांनी निकाल देताना माहिती तंत्रज्ञान अधिनियमाच्या कलम ६९अ अंतर्गत प्लॅटफॉर्मवरील प्रवेश मर्यादित करण्यासाठी अवलंबण्यात आलेल्या प्रक्रियेबाबत समाधान व्यक्त केले. कारवाईमागील कारणे पुरविण्यात आली नसल्याच्या आधारावर करण्यात आलेले आव्हानही न्यायालयाने फेटाळून लावले. केंद्र सरकारला अधिकार असल्याचे न्यायालयाचे मत न्यायालयाने स्पष्ट केले की, माहिती तंत्रज्ञान अधिनियमाच्या कलम ६९अ अंतर्गत केंद्र सरकारला एखाद्या प्लॅटफॉर्मवर बंदी घालण्याचा अधिकार आहे. तसेच ही कारवाई प्रमाणबद्धतेच्या निकषांवरही योग्य ठरते, कारण उपलब्ध पर्यायांपैकी हा आवश्यक उपाय होता.

राष्ट्रीय परीक्षा संस्था आणि शिक्षण मंत्रालयाच्या उच्च शिक्षण विभागाच्या शिफारशींनंतर टेलिग्रामविरोधातील तात्पुरता बंदी आदेश जारी करण्यात आला होता. टेलिग्रामचा दावा टेलिग्रामने न्यायालयात दावा केला की, नीट परीक्षेशी संबंधित बेकायदा मजकूर असलेल्या ९०० हून अधिक लिंक्स प्लॅटफॉर्मवरून हटविण्यात आल्या आहेत. तसेच बेकायदा माहितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंग तंत्रज्ञानाचाही वापर करण्यात येत असल्याचे कंपनीने सांगितले. केंद्र सरकारची बाजू दुसरीकडे, केंद्र सरकारने न्यायालयात सांगितले की, टेलिग्रामच्या तांत्रिक आणि संरचनात्मक वैशिष्ट्यांमुळे बॉट्स यांच्या माध्यमातून स्वयंचलित अकाउंट्स तयार करणे आणि मोठ्या प्रमाणावर मेसेज प्रसारित करणे शक्य होते आणि त्यासाठी सतत मानवी हस्तक्षेपाची आवश्यकता नसते.

## थोडक्यात

### संजय राऊतांनी औरंगजेबाचा इतिहास सांगायला हवा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - शिवसेनेच्या वर्धापन दिनानिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास सांगण्यापेक्षा संजय राऊत यांनी ते ज्या औरंगजेबाचा वैचारिक वारसा चालवतायेत त्या औरंजेबाचा इतिहास सांगायला हवा. शिवाजी महाराजांचा इतिहास हा स्वाभिमानाचा आणि विचार हिंदुत्वाचे होते. तुमचा इतिहास हा औरंगजेबाच्या चरणावर आपला पक्ष अर्पण करण्याचा आणि अफझलखानाच्या कबरीवर माथा टेकण्याचा आहे. सातत्याने औरंगजेबाचा उदो उदो करणाऱ्या काँग्रेसच्या मांडीला मांडी लावून बसल्याने तुम्हाला शिवाजी महाराजांचे नाव घेण्याचाही अधिकार नाही, असा प्रहार भाजपा प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी शुक्रवारी केला.

## चुडामनी नदीपात्रात आढळली तंबाखूजन्य पदार्थांची पोती?

### धास्ती धडक कारवाहीची : अवैध साठेबाजांमध्ये प्रचंड भीती

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** - तंबाखू मिश्रित पदार्थांवर प्रशासनाने सुरू केलेल्या धडक कारवाईमुळे अवैध साठेबाजांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अशातच वरुड शहरातील चुडामणी नदीपात्रात तंबाखूची पोती फेकून दिल्याची घटना समोर आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

नदीपात्रात काही पोती पडून असल्याचे निदर्शनास आल्यानंतर परिसरात नागरिकांची गर्दी झाली. पोत्यांमध्ये सुगंधी तंबाखू असल्याचे आढळून आले. अज्ञात व्यक्तींनी रात्रीच्या वेळी ही पोती नदीपात्रात आणून टाकल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. अलीकडे प्रशासनाकडून विविध प्रकारच्या नियमबाह्य साठ्यांवर कारवाई होत असल्याच्या पार्श्वभूमीवर, कारवाईच्या भीतीने हा माल येथे टाकण्यात आला असावा, असे बोलले जात आहे.

मात्र याबाबत कोणतीही अधिकृत माहिती उपलब्ध झालेली नाही. चुडामन नदीपात्रात आढळून आलेल्या या तंबाखूच्या पोत्यांमुळे दिवसभर शहरात चर्चेचा विषय रंगला होता. पोती कोणी आणली आणि ती नदीपात्रात कशी पोहोचली, याबाबत नागरिकांमध्ये उत्सुकता व्यक्त होत आहे.

स्थानिक नागरिकांना नदीपात्रात संशयास्पद पोती आढळून आली. पाहणी केली असता त्यामध्ये तंबाखूजन्य पदार्थ असल्याचे दिसून आले. प्रशासनाच्या कारवाईच्या भीतीने अज्ञात व्यक्तींनी पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने ही पोती नदीपात्रात फेकल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगली आहे. दरम्यान, या प्रकारामुळे पर्यावरणीय प्रदूषणाचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. नदीपात्रात अशा प्रकारे तंबाखूजन्य पदार्थ टाकल्याने परिसराच्या स्वच्छता आणि पर्यावरणावर परिणाम होऊ शकतो, अशी चिंता नागरिकांनी व्यक्त केली आहे.

घटनेची माहिती मिळताच संबंधित यंत्रणांनी चौकशी सुरू केली असून ही पोती नेमकी कुणी आणि कशासाठी फेकली? याचा शोध घेतला जात आहे. प्रशासनाकडून दोषींवर कठोर कारवाई होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

## शिक्षकांना अध्यापनासाठी मिळणार अधिक वेळ : माहितीचा वार शनिवार निश्चित

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**मुंबई** - शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या माध्यमातून शिक्षकांच्या शैक्षणिक व अशैक्षणिक कामाच्या अनुषंगाने सूचना करण्यात आल्या होत्या. त्या सूचना विचारात घेऊन शिक्षकांची शैक्षणिक कामे, अशैक्षणिक कामे व बालकाचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील नुसार महत्त्वाच्या कामांचे वर्गीकरण केले आहे. त्यानुसार शिक्षण विभागाने दर शनिवारी शालेय स्तरावरील माहिती सदर करण्याचा वार निश्चित केला आहे. या निर्णयामुळे शिक्षकांचा अतिरिक्त कामाचा ताण कमी होऊन विद्यार्थीची शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यासाठी वेळ मिळणार आहे. शाळा स्तरावरील विविध समित्यांचे एकत्रीकरण करून ४ समित्या तयार करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये यू-डायस व सरल प्रणालीचे एकत्रीकरण करून एकाच पोर्टलवर माहिती भरण्याची सुविधा दिली आहे.

## ईश्वराचा अवतार असल्याचे भासवून तरुणीचा छळ

### भोंदू बाबासह सहा जणांना अटक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**पुणे** - स्वतःला ईश्वराचा अवतार असल्याचे भासवून एका ५९ वर्षीय भोंदू बाबाने उच्चशिक्षित तरुणीवर अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

राधामोहन मिश्रा असे या मुख्य आरोपीचे नाव असून, त्याने तरुणीला ओलीस ठेवून तिचे अमानुष शोषण केले. याप्रकरणी खराडी पोलिसांनी राधामोहन मिश्रासह त्याचा साथीदार स्वामी कंवल नयन आणि अन्य सहा महिलांना अटक केली आहे. पीडित तरुणी पुण्यातील एका खासगी कंपनीत नोकरी करत असून, आरोपींनी २००१ ते २०२६ या प्रदीर्घ कालावधीत हरियाणा आणि पुणे परिसरात हा गुन्हा केल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे.

स्वामी कंवल नयनच्या माध्यमातून पीडितेच्या कुटुंबाची ओळख पंचकुला येथील गुरुदेव साधना धाम ट्रस्ट चालवणाऱ्या राधामोहन मिश्राशी झाली होती.

मिश्रा हा साक्षात ईश्वराचा अवतार असल्याचा बनाव रचून त्याने भाविकांची दिशाभूल केली. याच श्रद्धेचा गैरफायदा घेऊन आरोपींनी तरुणीला पतीपासून वेगळे केले आणि तिची सर्व मालमत्ता स्वतःच्या नावावर करून घेतली. तिला कुटुंबापासून वेगळे पाडून अमानुष शारीरिक व मानसिक छळ केल्याची माहिती समोर आली आहे.



# चौकशी दरम्यान अडथळा निर्माण करणाऱ्याविरुध्द गुन्हा दाखल करा

## महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियन तालुका शाखा वरुडची मागणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**वरुड** – ग्रामपंचायत सातनूर येथे ३० जून २०२६ रोजी सुरु असलेल्या चौकशी दरम्यान काही व्यक्तींनी शासकीय कामकाजात अडथळा निर्माण केल्याने त्यांचेवर फौजदारी कार्यवाही होईपर्यंत ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी सभा बंद, अहवाल बंद आंदोलन सुरु केले असून याबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियन, डी.एन.ई. १३६ तालुका शाखा वरुड यांनी गटविकास अधिकाऱ्यांना एका निवेदनाव्दारे दिले आहे.

या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, ग्रामपंचायत सातनूर येथील ग्रामपंचायत अधिकारी व्ही.बी.घोगरे व चौकशी समितीतील सदस्य यांच्या शासकीय कामकाज करीत असतांना पवन चौधरी यांनी अनेक वेळा ग्रामपंचायतीची चौकशी करीत असतांना अडथळा निर्माण केलेला असून अरेरावीच्या भाषेचा वापर करुन धमकविण्यात आल्याने सदर व्यक्तीवर फौजदारी स्वरुपाची कार्यवाही होवुन न्याय मिळत नाही तोपर्यंत तालुका शाखा वरुडच्या वतीने सदर सभांवर व अहवाल बंद आंदोलन १८ जून पासुन सभा बंद व अहवाल बंद आंदोलन सुरु केले असून तातडीने याबाबत निर्णय घ्यावा, असा ईशारा संघटनेचे पदाधिकारी धनराज पोटे, विनोद वडस्कर, प्रशांत वानखडे, सतिश गिरी, मुजफ़्फर शेख, एम.जी.राऊत, पी.बी.कडू, डी.जी.सरोदे, नरेंद्र इंगळे, यु.बी.बन्सरे, पी.जे.कवटकर, व्ही.एस.प्रतिके, एस.एस.दांदळे, वैशाली चांदुरकर, विजय लोहे आदींनी दिला आहे.

# २ दिवसांत ४ नीट विद्यार्थ्यांकडून आयुष्याचा शेवट

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**कोईम्बतूर** – तामिळनाडूतील कोईम्बतूर येथील १९ वर्षीय नीट विद्यार्थिनी अनुकीर्तनाने बुधवारी सकाळी विष प्राशन करून आत्महत्या केली. मृत्यूआधी तिने तिच्या काकांना आणि जवळच्या नातेवाईकांना व्हॉट्सॲपवर संदेश पाठवले होते. त्या संदेशात तिने लिहिले होते, 'मी नीट परीक्षा दिली होती आणि वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेशाची वाट पाहत होते, पण परीक्षा रद्द झाली. आता मला पुन्हा परीक्षा देण्याची भीती वाटते. माझ्या वडिलांनी माझ्यावर खूप पैसे खर्च केले आहेत आणि मी पुन्हा त्यांचा सामना कसा करणार हे मला माहीत नाही.'

दरम्यान, अहमदाबादच्या न्यू राणीप परिसरात गुरुवारी पहाटेच्या सुमारास आनंदम फ्लॅट्सच्या ब्लॉक बी मधील सहाव्या मजल्यावरून एका १७ वर्षीय विद्यार्थ्याने उडी मारली. पोलिसांच्या तपासात असे उघड झाले आहे की, तो विद्यार्थी नीट परीक्षेची तयारी करत होता. आत्महत्येचे कारण अद्याप अज्ञात आहे. गेल्या दोन दिवसांतील नीट विद्यार्थ्यांच्या आत्महत्येची ही चौथी घटना आहे. यापूर्वी, १६ जून रोजी डेहराडूनमधील २३ वर्षीय रिया थापा आणि लखनौमधील एका १७ वर्षीय विद्यार्थिनीने आत्महत्या केली होती. १२ मे रोजी नीट परीक्षा रद्द झाल्यापासून देशभरात अंदाजे १२ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला आहे.

# शिवसेनेच्या दोन्ही गटांचे आज मेळावे

## ठाकरेंचे षण्मुखानंदमध्ये, तर शिंदेंचे गोरेगाव नेस्को संकुलात शक्तिप्रदर्शन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – शिवसेनेच्या स्थापनेचे हीरक महोत्सवी वर्ष पूर्ण होत असतानाच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या सहा खासदारांनी केलेल्या बंडखोरीच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी शिवसेनेच्या दोन्ही गटांतर्फे वर्धापनदिनानिमित्त मेळाव्याचे आयोजन केले आहे. ठाकरे गट आणि शिंदे गटाचा मेळावा स्वतंत्र होणार आहे.

पक्षात घडलेल्या मोठ्या राजकीय घडामोडींच्या संदर्भात ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे मेळाव्यात कोणती भूमिका मांडणार आणि त्याला शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे कोणते प्रत्युत्तर देणार याकडे अवघ्या राजकीय वतुर्ळाचे लक्ष लागले आहे.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षातच शिवेसेनेचा ६० वा वर्धापनदिन साजरा होत आहे. मात्र, वर्धापनदिनाच्या पूर्वसंध्येला एकनाथ शिंदे यांनी 'ऑपरेशन टायगर' राबवून चार वर्षांतच उद्धव ठाकरेंना मोठा धक्का दिला.

# दिवा स्थानकात गर्डर उभारणीसाठी विशेष ब्लॉक

## काही लोकल सेवा रद्द, मेल-एक्स्प्रेस गाड्याही उशिराने धावणार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – मध्य रेल्वेच्या दिवा स्थानकाच्या दक्षिण (सीएसएमटी) तसेच उत्तर (कल्याण) टोकावरील नव्या पादचारी पुलाच्या गर्डर उभारणीसाठी शुक्रवारी मध्यरात्री विशेष ब्लॉक घेण्यात आला आहे. हा ब्लॉक मध्यरात्री १२.१० ते पहाटे ४.१० या वेळेत घेतला आहे. त्यामुळे काही लोकल आणि मेल-एक्स्प्रेस गाड्यांच्या सेवांवर याचा परिणाम होणार आहे.




ब्लॉकदरम्यान ठाणे-डोंबिवली अप आणि डाऊन जलद मार्गिका, पाचवी व सहावी मार्गिका, तसेच दिवा-निलजे दरम्यानची दिवा- पनवेल-रोहा मार्गिका प्रभावित होईल. शुक्रवारी रात्री ३.४३ वाजता अंबरनाथहून सुटणारी अंबरनाथ-सीएसएमटी लोकल, पहाटे ५.१६ वाजता सीएसएमटीहून सुटणारी सीएसएमटी-अंबरनाथ लोकल रद्द करण्यात आली आहे, तर कल्याण-ठाणे विभागातील अप जलद मार्गिका आणि सहाव्या मार्गिकेवरील मेल व एक्स्प्रेस गाड्या अप धीम्या मार्गिकेवर वळिवण्यात येतील.

# पुढचे 'लक्ष्य': शरद पवार गट, आता राज्यात 'ऑपरेशन तुतारी'ची शक्यता

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे संसदीय पक्षातील फूट यशस्वी केल्यानंतर आता पुढील लक्ष्य हे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट असणार आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे संसदीय पक्षातील फूट यशस्वी केल्यानंतर आता पुढील लक्ष्य हे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट असणार आहे. या गटाचे राजकीय ऑपरेशन करण्याची जबाबदारी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटावर दिली जाण्याची शक्यता आहे. शरद पवार गटाच्या ८ पैकी किमान सहा खासदारांना गळाला लावण्याचे जोरदार प्रयत्न सुरू असल्याचे खात्रीलायक सूत्रांकडून समजते.

राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे लोकसभेतील दोन तृतीयांश संख्याबळ सिद्ध करण्यासाठी भाजपने कंबर कसली आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यात शिवसेना ठाकरे गटात फूट पाडण्यात आली. त्याची जबाबदारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वीकारली. ही फूट कायद्याच्या कसोटीवर टिकल्यानंतर लगेचच शरद पवार गटाच्या खासदारांना वळिवण्याचे प्रयत्न होणार आहेत. हे प्रयत्न अजित पवार गटाच्या नेत्यांमार्फत होऊ शकतात, अशी माहिती सूत्रांनी दिली. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे लोकसभेत आठ खासदार आहेत.त्यात सुप्रिया सुळे (बारामती), अमोल कोल्हे (शिरूर), नीलेश लंके (अहिल्यानगर), भास्कर भगरे (दिंडोरी), धैर्यशील मोहिते-पाटील (माढा). बजरंग सोनावणे (बीड), सुरेश म्हात्रे (भिवंडी) आणि अमर काळे (वर्धा) यांचा समावेश आहे. यापैकी सुळे आणि कोल्हे वगळता अन्य खासदार शरद पवार गटाची साथ सोडू शकतात किंवा कसे याची चाचपणी सध्या सुरु आहे. ही चाचपणी पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष मोहिमेला वेग दिला जाण्याची शक्यता आहे.




भाजपच्या पाठबळाने लोकसभा खासदारांमध्ये फूट पाडण्याचे प्रयत्न होऊ शकतात याची कल्पना शरद पवारांना आहे. त्यादृष्टीने पवार यांनी संभाव्य राजकीय संकटाला तोंड देण्याची तयारी केल्याचे समजते. याशिवाय पक्षाचे नेते खासदारांच्या संपर्कात असून त्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यात येत आहे.

## खुल्या फिडे रॅपिड रेटिंग बुद्धिबळ स्पर्धेत

# रिधम सहारे याला व्दितीय क्रमांकाचा पुरस्कार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – आंतरराष्ट्रीय दर्जाच्या खुल्या फिडे रॅपिड रेटिंग बुद्धिबळ स्पर्धेत ग्रामीण भागातील गुणवत्ता व बुद्धिमत्ता पुन्हा परत एकदा प्रकाश झोतात आली.




शेंदूरजनाघाट (मलकापूर) येथील रिधम भास्कर सहारे याने जी.एच.रायसोनी मेमोरियल नागपूर चेस फेस्टिवल- २०२६ जी.एच.रायसोनी इन्स्टिटयूट ऑफ इंजिनीयरिंग टेक्नॉलॉजी हिंगना येथे खेळल्या गेलेल्या आंतरराष्ट्रीय फिडे रेटिंग स्पर्धेत वरिष्ठ फिडे रेटिंग प्राप्त खेळाडुंवर विजय मिळवित अनरेटेड गटात एकूण ९ पैकी ६.५ गुण घेत दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त केला आहे.

या स्पर्धेत देशभरातील नामांकित खेळाडू एफएम, आयएम, व्हीव्हीआयएम, डब्ल्युआयएम, एएफएम असे एकूण ५६४ खेळाडूंनी सहभाग नोंदविला.. या नामांकित खेळाडूंच्या गर्दीत अमरावती जिल्ह्यातील शेंदूरजनाघाट (मलकापूर) येथील रीधम सहारे हा तारा चमकला असून अनरेटेड गटात दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक देऊन त्यांचे वडील भास्कर सहारे यांचे समक्ष त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

रीधम सहारे याने मिळविलेल्या यशाबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक करीत त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. विशेष म्हणजे यापूर्वी अमरावती येथे पोद्दार स्कूलमध्ये गेल्या ११ मे २०२६ ला खेळल्या गेलेल्या आंतरराष्ट्रीय फिडे रॅपिड स्पर्धेततही रिधम सहारे याने दुसऱ्या क्रमांकाचे अनरेटेड गटात पारितोषिक मिळिवले होते.

# झटामझिरी येथील सरपंच हिराकांत उईके अपात्र घोषीत

## अपर आयुक्त सूरज वाघमारे यांच्या न्यायालयाचा निर्णय

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – तालुक्यातील झटामझिरी येथील सरपंच हिराकांत उईके यांना अपर आयुक्त सूरज वाघमारे यांनी अपात्र घोषीत केले आहे. ग्रामपंचायत सदस्य सुनिल कंगाले यांनी दाखल केलेल्या याचिकेवर हा निर्णय देण्यात आला आहे.




झटामझिरी येथील सरपंच हिराकांत उईके यांचे विरुद्ध ग्रामपंचायत सदस्य सुनील कंगाले यांनी सरपंच हिराकांत उईके यांनी पदाचा गैरवापर करुन त्यांचे कुटुंबातील सदस्य त्यांची आई रामवती जानराव उईके हिच्या नावे सबरी आवास योजनेअंतर्गत घरकुल मिळण्याकरिता आपल्या पदाचा दुरुपयोग करून प्रस्ताव मंजूर केला तसेच सदर घरकुल योजने अंतर्गत एकत्रित कुटुंबातील एका व्यक्तीलाच सदर योजनेचा लाभ घेता येतो परंतु ग्रा.पं.झटामझिरीचे सरपंच हिराकांत उईके यांचे भाऊ कमलनारायण उईके यांना देखील सदर घरकुल अंतर्गत घरकुल मंजूर करून दिले. सरपंच यांचे आई व भाऊ एकत्रित कुटुंबामध्येच राहत असून एकाच कुटुंबातील घटक आहेत. सदर योजने अंतर्गत एकत्रित कुटुंबातील एकाच व्यक्तीस घरकुल योजनेचा लाभ घेता येतो, परंतु हे दोन्ही व्यक्ती एकाच घरात राहत असल्याने सरपंच यांनी त्यांचा पदाचा दुरुपयोग करून एकाच कुटुंबातील दोन व्यक्तींना सबरी आवास योजनेअंतर्गत घरकुल मंजूर करून हप्त्याची रक्कम सुध्दा दिलेली आहे तसेच सरपंच यांचे भाऊ कमलनारायण उईके हे अविवाहित असल्याने घरकुल योजनेस पात्र नसताना देखील सरपंच यांनी पदाचा दुरुपयोग करून अवैधरीत्या घरकुलचा लाभ मिळवून दिला तसेच सरपंच यांचे नातेवाईक दीपक रामा उईके यांच्या पत्नी सुमन रामा उईके यांनी सन २००५-२००६ ला सदर घरकुल योजनेचा लाभ घेतला असून सुद्धा पती दीपक उईके यांना आपल्या पदाचा दुरुपयोग करून एकत्रित कुटुंबातील दुसऱ्या व्यक्तीच्या नावे दुसऱ्यांदा घरकुल मंजूर करून दिले व घरकुलच्या हफ्त्याचे पैसे सुध्दा दिलेले गानब असल्याचे आढळून आल्याने या विरोधात याच ग्रामपंचायतचे सदस्य सुनील उईके यांनी तक्रार केली होती.

सदर गैरव्यवहार प्रकरणात सरपंच दोषी असल्याचे आढळल्याने अपर आयुक्त सूरज वाघमारे यांचे न्यायालयाने सरपंच हिराकांत उईके यांनी त्यांचे पदाचा दुरुपयोग, कर्तव्यात कसूर तसेच आर्थिक अनियमितता केल्याचे आढळून आल्याने सरपंच पदावरून अपात्र घोषित करण्याचे आदेश पारित केला. या प्रकरणात अर्जदाराची बाजु ॲड.राजेश भोपत यांनी मांडली.

## संपादकीय

**स्वप्ने तेव्हाच पूर्ण होतात, जेव्हा मेहनत त्यांच्यासोबत असते.**

### लोकशाही बळकट करण्याचे आपल्यासमोरील आव्हान

महाराष्ट्रातील आणि एकंदरीतच देशातील अलीकडील राजकीय, सामाजिक आणि घटनात्मक घडामोडींच्या पार्श्वभूमीवर आज आपल्यासमोर एक अत्यंत मूलभूत आणि गंभीर प्रश्न उभा ठाकला आहे. तो प्रश्न म्हणजेक्षआपण एक समाज आणि राष्ट्र म्हणून आपली लोकशाही अधिक मजबूत करणार आहोत की ती केवळ नावापुरतीच मर्यादित ठेवणार आहोत? गेल्या काही वर्षांत राजकारणाचा घसरलेला स्तर, पक्षांतरांचे अभूतपूर्व खेळ, सत्तेसाठी तत्त्वांना दिलेली मूठमाती आणि तपास यंत्रणांचा कथित गैरवापर यामुळे सर्वसामान्य जनतेच्या मनात लोकशाही व्यवस्थेबद्दल एक प्रकारची अस्वस्थता आणि संभ्रम निर्माण झाला आहे. अशा वातावरणात लोकशाहीच्या मूळ ढाच्याचे रक्षण करणे आणि ती अधिक प्रगल्भ करणे, हे आज प्रत्येक सजग नागरिकासमोरील सर्वात मोठे आव्हान आहे. राजकीय अस्थिरता आणि मूल्यांचा ऱ्हास महाराष्ट्राने गेल्या काही वर्षांत जे राजकीय नाट्य पाहिले, त्याने देशाच्या संसदीय लोकशाहीच्या इतिहासात अनेक नवे आणि चिंताजनक पायंडे पाडले आहेत. पक्षांतर बंदी कायद्याच्या चिंधड्या उडवत ज्या प्रकारे सत्तांतरे झाली, पक्षांची नावे आणि चिन्हे बदलली गेली, त्याने मतदारांच्या सार्वभौमत्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. 'मतदार निवडणुकीत एका विचारसरणीला किंवा पक्षाला मत देतो, पण निवडणुकीनंतर त्याचे मत भलतीकडेच वळवले जाते. हा थेट मतदारांचा आणि लोकशाहीचा घोर अपमान आहे.' जेव्हा राजकीय पक्षांना आणि नेत्यांना जनमतापेक्षा सत्तेचे गणित अधिक महत्त्वाचे वाटू लागते, तेव्हा लोकशाहीचा पाया डळमळीत होतो. सत्तेच्या या साठमारीत जनहिताचे मुद्दे, जसे की बेरोजगारी, महागाई, शेतकऱ्यांचे प्रश्न आणि पायाभूत सुविधा, पूर्णपणे बाजूला पडले आहेत. लोकशाहीचे चार स्तंभ आणि सद्यस्थिती लोकशाही सुदृढ राहण्यासाठी तिचे चारही स्तंभकायदेमंडळ, कार्यपालिका, न्यायव्यवस्था आणि प्रसारमाध्यमेस्वतंत्र आणि मजबूत असणे आवश्यक आहे. परंतु, आज या चारही स्तंभांवर वेगवेगळ्या प्रकारे दबाव असल्याचे दिसून येत आहे. कायदेमंडळ : संसदेत किंवा विधानसभेत होणाऱ्या चर्चांचा दर्जा घसरला आहे. विरोधकांचा आवाज दडपणे किंवा गोंधळातच महत्त्वाची विधेयके मंजूर करून घेणे हे नित्याचे झाले आहे. कार्यपालिका : प्रशासकीय यंत्रणा आणि केंद्रीय तपास यंत्रणांचा वापर राजकीय विरोधकांना नमवण्यासाठी केला जात असल्याचा आरोप सातत्याने होत आहे. यामुळे यंत्रणांची विश्वासार्हता धोक्यात आली आहे. न्यायव्यवस्था: न्यायव्यवस्था हा लोकशाहीचा शेवटचा आशेचा किरण आहे. न्यायालयाने अनेक प्रसंगी महत्त्वाचे निर्णय देऊन लोकशाहीचे रक्षण केले असले, तरी काही प्रकरणांमध्ये होणारा विलंब आणि राजकीय संवेदनशीलतेच्या मुद्द्यांवर सामान्यांच्या मनात निर्माण होणारे प्रश्न अनुत्तरित राहतात. प्रसारमाध्यमे लोकशाहीचा 'चौथा स्तंभ' मानली जाणारी माध्यमे आज बहुतांश प्रमाणावर सत्ताधाऱ्यांची तळी उचलण्यात किंवा सनसनाटी निर्माण करण्यात व्यस्त आहेत. जनतेच्या खऱ्या प्रश्नांना वाचा फोडण्याऐवजी ती केवळ राजकीय अजेंडा चालवताना दिसतात.

# जनसंवाद: लोकशाहीचा आत्मा आणि प्रगतीचा पाया

'जनसंवाद' म्हणजे केवळ लोकांमध्ये बोलणे नव्हे, तर जनतेचे ऐकणे, त्यांच्या भावना समजून घेणे आणि शासन, प्रशासन व समाज यांच्यात एक विश्वासाचा सेतू निर्माण करणे होय. कोणत्याही जिवंत लोकशाहीमध्ये आणि प्रगतीशील समाजात 'जनसंवाद' हा त्या व्यवस्थेचा कणा असतो. आजच्या आधुनिक, गतिमान आणि डिजिटल युगात जनसंवादाचे स्वरूप बदलले असले, तरी त्याचे मूलभूत महत्त्व आजही तितकेच, किंबहुना त्याहून अधिक वाढले आहे.



जनसंवाद म्हणजे काय? सोप्या शब्दांत सांगायचे तर, जनसंवाद म्हणजे व्यापक जनसमुदायाशी साधलेला सुसंवाद. हा संवाद एकतर्फी नसून द्वितर्फी असणे अपेक्षित असते. जेव्हा एखादा नेता, विचारवंत, समाजसुधारक किंवा शासन जनतेशी संवाद साधते आणि जनताही त्याला तितक्याच उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देते, तेव्हा खऱ्या अर्थाने जनसंवाद आकारास येतो. संवादामध्ये जेव्हा 'वाद' आणि 'विवादा'ऐवजी 'समज' आणि 'सहकार्य' या भावनांना प्राधान्य दिले जाते, तेव्हा तो समाज परिवर्तनाचे मोठे माध्यम बनतो.

लोकशाही आणि जनसंवादाचे नाते 'जनसंवाद हा लोकशाहीचा श्वास आहे. जर संवाद थांबला, तर लोकशाहीचा कोंडमारा होतो आणि हुकूमशाहीचा जन्म होतो.'

लोकशाही व्यवस्थेत जनतेला 'राजा' मानले गेले आहे. परंतु, हा राजा केवळ पाच वर्षांतून एकदा मतदान करण्यापुरता मर्यादित राहू नये, यासाठी सातत्यपूर्ण जनसंवादाची गरज असते. पारदर्शकता आणि उत्तरदायित्व: शासनाने घेतलेले निर्णय, राबवलेल्या योजना आणि धोरणे लोकांपर्यंत पोहोचवणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. त्याच वेळी, त्या योजनांबद्दल जनतेच्या काय प्रतिक्रिया आहेत, त्यांच्या काय अडचणी आहेत, हे जाणून घेणे म्हणजे जनसंवाद.

अविश्वासाचे वातावरण दूर करणे: जेव्हा सरकार किंवा यंत्रणा आणि सर्वसामान्य जनता यांच्यात संवादाची दरी निर्माण होते, तेव्हा अफवा, गैरसमज आणि असंतोष पसरतो. अलीकडच्या काळात महाराष्ट्रात आणि देशात अनेक आंदोलने केवळ संवादअभावी दीर्घकाळ रेंगाळल्याचे आपण पाहिले आहे. जर सुरुवातीच्या काळातच योग्य जनसंवाद साधला गेला, तर अनेक मोठे संघर्ष टाळता येऊ शकतात.

जनसंवादाची बदलती माध्यमे: पारंपरिक ते डिजिटल काळाच्या ओघात जनसंवादाच्या साधनांमध्ये आमूलाग्र बदल झाला आहे. पारंपरिक माध्यमे: पूर्वीच्या काळी राजे-महाराजे दवंडी पिटवून किंवा जाहीर सभा घेऊन जनतेशी संवाद साधायचे. स्वातंत्र्यानंतरच्या काळात जाहीर सभा, कोपरा सभा, वर्तमानपत्रे आणि आकाशवाणी (रेडिओ) ही जनसंवादाची प्रमुख माध्यमे बनली. महात्मा गांधींनी 'हरिजन' आणि 'नवजीवन' वृत्तपत्रांतून, तर लोकमान्य टिळकांनी 'केसरी'तून जनतेशी संवाद साधला.

आधुनिक आणि डिजिटल क्रांती: आजचा काळ सोशल मीडियाचा आहे. आज एका क्लिकवर कोट्यवधी लोकांपर्यंत संदेश पोहोचवता येतो. देशाच्या पंतप्रधानांचा 'मन की बात' कार्यक्रम असो किंवा मुख्यमंत्र्यांचे सोशल मीडिया लाईव्ह, हे जनसंवादाचे आधुनिक चेहरे आहेत.

डिजिटल माध्यमांचे आव्हान: तंत्रज्ञानाने संवाद सोपा केला असला, तरी त्यात 'जिव्हाळा' कमी झाला आहे. आजचा संवाद अनेकदा 'एकतर्फी ट्रोलिंग' किंवा 'फेक न्यूज'च्या विळख्यात सापडतो. त्यामुळे डिजिटल माध्यमांचा वापर करताना संवादाचे गांभीर्य टिकवणे हे मोठे आव्हान आहे.

प्रशासनात 'जनसंवादा'ची गरज सामान्य माणसाला सरकारी कार्यालयात हेलपाटे मारावे लागू नयेत आणि त्यांच्या तक्रारींचे निवारण व्हावे, यासाठी प्रशासकीय पातळीवर जनसंवाद अत्यंत महत्त्वाचा ठरतो.

लोकअदालत आणि जनता दरबार: जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक किंवा स्थानिक लोकप्रतिनिधींनी नियमित 'जनता दरबार' किंवा 'लोकशाही दिन' आयोजित करून लोकांच्या समस्या थेट ऐकल्या पाहिजेत.

तळागाळातील विकास: ग्रामसभा हे ग्रामीण भागातील जनसंवादाचे सर्वात मोठे आणि वैधानिक व्यासपीठ आहे. गावाच्या विकासाचा आराखडा तयार करताना गावातील प्रत्येक नागरिकाशी संवाद साधला गेला, तरच तो विकास शाश्वत ठरतो. सद्य राजकीय परिस्थिती आणि जनसंवादाचा अभाव आजच्या राजकीय पटलावर नजर टाकल्यास असे दिसून येते की, नेत्यांमधील आणि जनतेमधील 'खरा' संवाद कमी होत चालला आहे. आजचे राजकारण अनेकदा इव्हेंट मॅनेजमेंट आणि पीआर कंपन्यांच्या हातात गेले आहे. भाषणे होतात, घोषणा होतात, पण त्यात जनतेच्या मूलभूत प्रश्नांशी जोडलेली नाळ तुटलेली दिसते.

नेत्यांनी केवळ निवडणुका जिंकण्यासाठी जनतेसमोर जाण्याऐवजी, त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होण्यासाठी 'संवाद यात्रा' काढणे गरजेचे आहे. जनतेला भाषणे ऐकण्यापेक्षा त्यांच्या व्यथा ऐकणारा आणि त्यावर ठोस कृती करणारा नेता अधिक जवळचा वाटतो.

यशस्वी जनसंवादाची सूत्रे एक प्रभावी आणि यशस्वी जनसंवाद कसा असावा? त्यासाठी खालील गोष्टी आवश्यक आहेत: सहानुभूती समोरच्या व्यक्तीच्या भूमिकेत शिरून त्याचे दुःख समजून घेण्याची क्षमता संवादकर्त्याकडे असावी.

सोपी आणि प्रादेशिक भाषा: संवाद नेहमी जनतेच्या भाषेत असावा. क्लिष्ट इंग्रजी किंवा बोजड शब्दांपेक्षा स्थानिक बोलीभाषेत (उदा. वऱ्हाडी, अहिराणी, कोकणी) साधलेला संवाद थेट मनाला भिडतो.

सहिष्णुता आणि संयम: जनसंवादात केवळ स्तुती ऐकून चालत नाही, तर जनतेचा संताप, त्यांचे प्रश्न आणि टीकाही संयमाने ऐकून घेण्याची तयारी असावी लागते.

जनसंवाद ही केवळ एक प्रक्रिया नसून ती एक सामाजिक संस्कृती आहे. देश आणि राज्याचा विकास केवळ सिमेंटच्या जंगलांनी किंवा मोठ्या प्रकल्पांनी होत नसतो, तर तो तिथल्या माणसांच्या समाधानाने होतो. हे समाधान तेव्हाच निर्माण होऊ शकते जेव्हा समाजातील शेवटच्या घटकाला असे वाटेल की, 'माझा आवाज ऐकला जात आहे.'

आजच्या काळात आपल्याला अशा जनसंवादाची गरज आहे जो समाजाला जोडेल, तोडणार नाही; जो जाती-धर्माच्या भिंती पाडून विकासाची भाषा करेल. जेव्हा देशातील प्रत्येक नागरिक, प्रशासन आणि नेतृत्व एकमेकांशी प्रामाणिकपणे सुसंवाद साधतील, तेव्हाच खऱ्या अर्थाने लोकशाही समृद्ध होईल आणि प्रगतीचा मार्ग सुकर होईल. हीच समृद्ध आणि सशक्त भारताची खरी सुरुवात असेल.

# विनोदाचा घसरता स्तर आणि आपली सामाजिक संवेदनशीलता

अलीकडच्या काळात स्टँड-अप कॉमेडीच्या वाढत्या लोकप्रियतेसोबतच या क्षेत्रात घडणाऱ्या घडामोडींमुळे एक गंभीर प्रश्न ऐरणीवर आला आहे. आजकाल व्यासपीठावर टाळ्या आणि 'व्ह्यूज' मिळवण्यासाठी अश्लीलता, द्विअर्थी संवाद, शारीरिक रचनेची विडंबना (इेवू डहराळपस) आणि कोणाची तरी मानहानी करणे, यालाच विनोद मानण्याची गल्लत केली जात आहे. 'अभिव्यक्ती स्वातंत्र्या'च्या



नावाखाली विनोदाचा हा घसरता स्तर खरोखरच चिंतेचा विषय बनला आहे.

वास्तविक पाहता, विनोद हे केवळ स्वस्त मनोरंजनाचे किंवा कोणालातरी कमी लेखण्याचे माध्यम नाही. आपल्याकडे आचार्य अत्रे, पु. ल. देशपांडे आणि द. मा. मिरासदार यांसारख्या महान साहित्यिकांनी विनोदाची एक समृद्ध परंपरा दिली आहे. त्यांच्या विनोदाने कधी कोणाचा अपमान केला नाही, की कोणाची जात, धर्म किंवा शारीरिक व्यंगावर आक्षेपार्ह टीका केली नाही. विनोद हा समाजाला आरसा दाखवणारा, मानवी स्वभावातील विसंगतींवर बोट ठेवणारा आणि माणसाला अंतर्मुख करणारा असावा लागतो. माणसाला हसवता हसवता अधिक संवेदनशील बनवणे, हे चांगल्या विनोदाचे लक्षण आहे.

'कोणालातरी दुखावून, खाली पाडून किंवा अश्लीलतेचा पदर धरून निर्माण होणारे हास्य हे तात्कालिक असू शकते, पण तो खरा विनोद नव्हे.'

आजच्या तरुण पिढीने आणि कलाकारांनी हे समजून घेणे आवश्यक आहे की, शिव्या न घालता किंवा कोणाची मानहानी न करताही दर्जेदार विनोद निर्मिती होऊ शकते. निखळ आणि सुसंस्कृत विनोद हा समाजाला जोडतो, तर आक्षेपार्ह विनोद समाजात कटुता निर्माण करतो. आपण एक प्रेक्षक म्हणून काय पाहायचे आणि कशाला दाद द्यायची, याचे भान ठेवले पाहिजे. जेव्हा प्रेक्षक अशा अश्लील विनोदांकडे पाठ फिरवतील, तेव्हाच या क्षेत्राला पुन्हा एकदा आपली जुनी, समृद्ध आणि सुसंस्कृत परंपरा गवसेल.

# धार्मिकता, स्वच्छता आणि आपली 'सोयीची' सामाजिक जाणीव

सकाळी सार्वजनिक बागेत फिरायला गेल्यावर निसर्गाचा आनंद घेण्याऐवजी अनेकदा मानवी स्वभावाचे विदारक दर्शन घडते. बागेची शोभा वाढवणारी कण्हेरी, गुलाब, मोगरा, कुंदा, गोकर्ण, जाई-जुई अशी सुंदर फुलं अनेक मध्यमवयीन किंवा वयस्कर बायका सर्रास तोडताना दिसतात. माळी बाबा नसताना चालणारा हा 'फूलबाजार' पाहून जर कोणी हटकले, तर उत्तर मिळते 'अहो, देवासाठीच तर नेतोय!'



पण प्रश्न असा पडतो की, 'चोरीची' फुलं देवाला खरंच चालतात का? निसर्गाची हानी करून, दुसऱ्याच्या हक्काचा आनंद हिरावून आणलेली फुलं पाहून तो ईश्वर तरी कसा प्रसन्न होईल? माळी कष्ट करून, खत-पाणी घालून बाग फुलवतो. सरकार त्याला पगार देते तो सर्वसामान्यांना आनंद मिळावा म्हणून. बागेत फुलं असली की पक्षी, फुलपाखरं, भुंगे आणि विविध कीटक तिथे बागडतात. निसर्गाची ही जैवविविधता मानवी मनाला स्तिमित करते. पण देवाच्या नावाखाली फुलं तोडणाऱ्यांना या निसर्गचक्राशी काही देणेघेणे नसते.

एकदा तर या मानसिकतेची कमालच पाहायला मिळाली. एक वयस्कर, स्थूल बाई बागेत आल्या. साडी-ब्लाऊज अशा पोशाखात त्यांनी अर्धा तास कडक व्यायाम केला. विविध उपकरणांवर कसरती करून त्या चांगल्या घामाघूम झाल्या होत्या. व्यायाम संपवून जाताना त्यांनी हळूच इकडेतिकडे पाहिले आणि उमललेले दोन सुंदर गुलाब पटकन तोडून आपल्या भिजलेल्या ब्लाऊजमध्ये दडवले! त्या बिचाऱ्या फुलांच्या नशिबाची आणि मानवी बुद्धीची कीव आल्याशिवाय राहत नाही. ज्या फुलांनी बागेत राहून शेकडो लोकांना सुगंध आणि आनंद दिला असता, ती थेट घामाघूम ब्लाऊजच्या अंधारात कोंडली गेली. ही कुठली भक्ती आणि हा कुठला सुजाणपणा? 'आपल्या वैयक्तिक भक्तीसाठी किंवा स्वार्थासाठी सार्वजनिक संपत्ती ओरबाडणे, हा एक सामाजिक गुन्हाच आहे.' अशीच दुसरी भीषण समस्या म्हणजे 'रिकाम्या प्लॉटमध्ये कचरा टाकणे'. आपल्या शहरांमध्ये किंवा कॉलनीमध्ये एखादा मोकळा प्लॉट असला, की जणू तो कचरा टाकण्यासाठीच सरकारने आरक्षित केला आहे, असा लोकांचा समज असतो. धक्कादायक बाब म्हणजे, स्वतःच्या प्रशस्त बंगल्याच्या शेजारी जरी मोकळा प्लॉट असला, तरी लोक आपला घरचा कचरा तिथेच फेकतात.

आपले घर स्वच्छ आणि लख्ख असावे, पण घराबाहेर पडणारा कचरा मात्र शेजाऱ्याच्या दारात किंवा मोकळ्या जागेत कुजत पडावा, ही आपली संकुचित वृत्ती आहे. त्या कचऱ्यामुळे डास होतात, दुर्गंधी पसरते, डुकरांचा आणि मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट होतो. पण 'तो प्लॉट माझा नाही, मग मला काय त्याचे?' हा विचार करून आपण आपल्याच आरोग्याशी खेळत असतो.

बागेतील फुलचोरी असो वा मोकळ्या प्लॉटमधील कचरा, या दोन्ही गोष्टी आपली 'सोयीची सामाजिक जाणीव' अधोरेखित करतात. घरात देव्हाऱ्यावर दिवा लावून स्वतःला धार्मिक म्हणवून घेणे आणि बाहेर निसर्गाची नासधूस करणे, यात मोठा विरोधाभास आहे. खरी भक्ती आणि खरी सुसंस्कृतपणा हा स्वतःच्या घराच्या चौकटीबाहेर सुरू होतो. जोपर्यंत आपण सार्वजनिक बागा, रस्ते आणि मोकळे प्लॉट हे आपलेच आहेत असे मानत नाही, तोपर्यंत आपला समाज खऱ्या अर्थाने सुशिक्षित होऊ शकणार नाही. बदल घडवण्यासाठी कायद्यापेक्षा स्वतःच्या मानसिकतेत डोकावून पाहण्याची आज गरज आहे.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी! पीएम किसान योजनेचा २३ वा हप्ता लवकरच जमा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना दिलासा देणारी महत्त्वाची बातमी समोर आली आहे. पीएम किसान योजनाचा २३ वा हप्ता २० जून २०२६ रोजी देशभरातील पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे. या निमित्ताने महाराष्ट्रात २० जून हा दिवस 'पीएम किसान उत्सव दिवस' म्हणून साजरा केला जाणार असल्याची माहिती राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली आहे. कृषी विभागाच्या वतीने राज्यभर विविध जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. गावागावांत शेतकरी मेळावे, माहिती सत्रे आणि ऑनलाइन कार्यक्रमांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना योजनेची माहिती दिली जाणार आहे. तसेच गावस्तरावर नियुक्त केलेले अधिकारी या कार्यक्रमात सहभागी होऊन लाभार्थी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत.

# बंडू जाधवांनी उद्धव ठाकरेंना सोडलं, शिवसेना वर्धापनदिनी पोस्टरवरुन मशाल गायब : 'अखंड शिवसेना, अटळ हिंदुत्व!'

(प्रतिनीधी वरुड दर्पण)






**नाशिक** – नाशिक जिल्ह्याला जणू लाचखोरीच्या ग्रहण लागले आहे. जिल्ह्यातील शासकीय कार्यालयांमधील लाचखोरीचे प्रकार थांबण्याचे नाव घेत नाहीये. अशातच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) आणखी एक मोठी कारवाई केली आहे. येवला येथील सहायक निबंधक, सहकारी संस्था कार्यालयातील मुख्य लिपिक सुधीर वाघ याला ५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले. मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदाराला सावकारी परवान्याचे नूतनीकरण करायचे होते. हे काम करून देण्यासाठी मुख्य लिपिक सुधीर वाघ याने यापूर्वी तब्बल ६० हजार रुपये घेतले होते. मात्र त्यानंतरही त्याने आणखी ७ हजार रुपयांची मागणी केली. तडजोडीनंतर ५ हजार रुपये स्वीकारण्याचे ठरले. पुन्हा पैसे देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदाराने एसीबीकडे धाव घेतली. तक्रारीची पडताळणी केल्यानंतर एसीबीच्या पथकाने येवला तहसील कार्यालयाच्या आवारात सापळा रचला. ठरल्याप्रमाणे तक्रारदाराकडून लाचेची रक्कम स्वीकारताच सुधीर वाघ याला रंगेहात पकडण्यात आले. पोलीस उपअधीक्षक स्वाती पवार यांच्या मार्गदर्शनाखाली शरद हेंबाडे, युवराज खांडवी आणि चालक समीर शेख यांच्या पथकाने ही कारवाई यशस्वी केली. विशेष म्हणजे, ज्या दिवशी नाशिक विधान परिषद निवडणुकीसाठी मतदान प्रक्रिया सुरू होती, त्याच दिवशी तहसील कार्यालयाच्या आवारात ही धडक कारवाई करण्यात आली.

## भेसळ रोखण्यासाठी मंत्री झिरवाळही मैदानात

# भल्या पहाटे नाशिकच्या दूध बाजारात अधिकाऱ्यांसह मारला छापा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**नाशिक** – राज्यातील अन्न भेसळीविरोधातील कारवाया अधिक तीव्र होत असतानाच अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी शुक्रवारी पहाटे नाशिकच्या दूध बाजारात अचानक भेट देत अधिकाऱ्यांसह छापा टाकला. मंत्र्यांच्या या अनपेक्षित भेटीमुळे बाजार परिसरात काही काळ खळबळ उडाली.

भल्या पहाटेच अधिकाऱ्यांसह मारला छापा जुन्या नाशिकमधील दूध बाजारात सकाळच्या वेळी पोहोचलेल्या मंत्री झिरवाळ यांनी दूध संकलन, वाहतूक आणि वितरण प्रक्रियेची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी दूध विक्रेत्यांशी संवाद साधत शहरातील दूध पुरवठ्याबाबत माहिती घेतली. तसेच संशयित दूध नमुने तपासणीसाठी घेण्याचे निर्देश देत काही नमुने अधिकाऱ्यांकडून जप्त करण्यात आले.

अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या मार्गदर्शनाखाली विभागाकडून भेसळखोरांविरोधात कठोर पावले उचलली जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून झालेल्या या अचानक तपासणीमुळे दूध व्यवसायातील नियमांचे पालन करणाऱ्यांना दिलासा मिळाला असून भेसळ करणाऱ्यांमध्ये मात्र धास्ती निर्माण झाली आहे. दरम्यान, घेतलेले दूध नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात येणार असून अहवालानुसार पुढील कारवाई केली जाणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

# टाटा मोटर्स पुणे येथे शासकीय आय.टी.आय अमरावतीच्या १७३ प्रशिक्षणार्थ्यांची निवड

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**अमरावती** – संत गाडगेबाबा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मोर्शी रोड, अमरावती येथे दिनांक १२ जून २०२६ रोजी भव्य भरती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते, टाटा मोटर्स पिंपरी चिंचवड, पुणे या नामांकित कंपन्यांमध्ये शिकाऊ उमेदवारी करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली होती, या भरती मेळाव्यात कंपनीचे प्रतिनिधी यांनी लेखी व मौखिक मुलाखत घेऊन आय टी आय पूर्ण केलेले व अंतिम वर्षात प्रशिक्षण घेत असलेले फिटर, टर्नर, मशिनिस्ट, मशिनिस्ट ग्राइंडर, मोटर मेकॅनिक व्हेईकल, डिझेल मेकॅनिक, टूल अँड डाय मेकर, मेकॅनिक ट्रॅक्टर , इलेक्ट्रिशन, वायरमन, इलेक्ट्रॉनिक्स, मेकॅनिक मशीन टूल मेंटेंस, मोटर मेकॅनिक व वेल्डर या व्यवसायातील प्रशिक्षणार्थ्यांची निवड करण्यात आली, निवड झालेल्या प्रशिक्षणार्थ्यांना कंपनीतर्फे कंपनी स्टायपेंड, सेफ्टी शूज, कंपनी एप्रोन, दिवाळी बोनस, ग्रुप इन्शुरन्स इत्यादी सर्व सुविधांचा लाभ मिळणार आहे, अत्यंत कमी शुल्क व कमी कालावधी मध्ये व्यावसायिक प्रशिक्षण करून पूर्ण करून रोजगाराची संधी उपलब्ध होत असल्यामुळे आयटीआय म्हणजे हमखास रोजगाराची संधी असा दृष्टिकोन समाजात प्रचलित आहेत, निवड झालेल्या सर्व १७३ प्रशिक्षणार्थ्यांचे सर्वच स्तरावर अभिनंदन होत आहे, संस्थेच्या उपसंचालिका सौ सुधा ढोंबरे मॅडम,उपप्राचार्य एस के बोरकर, उपप्राचार्य संजय बोरोडे यांचे सह संस्थेतील संपूर्ण कर्मचारी वृंदातर्फे यशस्वी उमेदवारांना पुढील उज्वल भविष्याकरिता शुभेच्छा देण्यात येत आहेत. तसेच संस्थेमध्ये १८ जून रोजी भव्य प्रमाणात ६०० जागा करिता महिंद्रा अँड महिंद्रा, नाशिक इगतपुरी पुणे करिता भव्य भरती मेळावा आयोजित करण्यात आले आहे, या संधीचा देखील प्रशिक्षण त्यांनी लाभ घ्यावा.

# सायबांच्या वाहनांना रेड कार्पेट! ब्रिटनच्या वाहनांना भारतात सवलत

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**नवी दिल्ली** – भारत आणि ब्रिटन दरम्यानचा द्विपक्षीय व्यापार करार १५ जुलैपासून लागू होत आहे. या करारान्वये पहिल्या १५ वर्षांच्या कालावधीत भारत यूकेमधून सर्वसामान्य ग्राहकांसाठीच्या मॉडेल्ससह पारंपरिक इंजिन असलेल्या (पेट्रोल/डिझेल) ३.७८ लाख प्रवासी कार्सच्या सवलतीच्या आयात शुल्कात आयातीला परवानगी देणार आहे. या 'व्यापक आर्थिक आणि व्यापार करारांतर्गत' (सीईटीए) ऑटोमोटिव्ह उत्पादनांवरील आयात शुल्क ११० टक्क्यांवरून थेट १० टक्क्यांवर येईल, ज्यासाठी दोन्ही बाजूंनी कोटा (निश्चित मर्यादा) ठरवला आहे. बुधवारी प्रसिद्ध झालेल्या भारत-यूके सीईटीए दस्तावेजातील माहितीनुसार, भारताला यूकेच्या इलेक्ट्रिक, हायब्रिड आणि हायड्रोजन प्रवासी कारच्या बाजारपेठेत प्रवेश मिळणार आहे. कराराच्या सहाव्या वर्षापासून २०,००० ते ८०,००० पौंड या किमतीच्या श्रेणीतील वाहनांची यूकेमध्ये शुल्कमुक्त निर्यात करता येईल. हा एकूण कोटा १५ व्या वर्षापासून दरवर्षी कमाल ८८,००० युनिटपर्यंत पोहोचेल आणि पुढील वर्षांमध्येही तो असाच सुरू राहील.

या निर्णयाचा टाटा मोटर्स पॅसेंजर व्हेइकल्स, महिंद्रा अँड महिंद्रा आणि मारुती सुझुकी यांसारख्या भारतीय वाहन उत्पादकांना मोठा फायदा होणार आहे.

यूकेमधून भारतात येणाऱ्या पारंपरिक इंजिनच्या गाड्यांचा कोटा पाचव्या वर्षी विविध श्रेणींमध्ये मिळून कमाल ३७,००० युनिट्सवर पोहोचेल आणि सीमाशुल्क कमी होऊन अंतिम १० टक्क्यांवर येईल. यापेक्षा कमी शुल्क केले जाणार नाही. पहिल्या वर्षी तिन्ही श्रेणी मिळून एकूण २०,००० प्रवासी कार आयात करण्याची परवानगी असेल.

# धरणांत १४ टक्के पाणीसाठा: पुणे जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याचे हाल होणार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – राज्यात पावसाने ओढ दिल्यानंतर धरणातील पाणीसाठा दिवसेंदिवस कमी होऊ लागला आहे. पुण्यातील धरणांमध्ये 'जिवंत' पाणीसाठा १४.३० टक्केच शिल्लक राहिला आहे. गेल्यावर्षी याच कालावधीत तो ३१.१६ टक्के होता. महाराष्ट्र जलसंपदा विभागाच्या दैनंदिन अहवालानुसार, यंदा मान्सूनचे आगमन लांबल्यामुळे राज्यातील अनेक भागांत गेल्या वर्षीच्या तुलनेत पाण्याची उपलब्धता खूपच कमी आहे. राज्यातील एकूण ३,०२८ धरणे, बंधारे आणि जलाशयांमध्ये गुरुवारी एकूण 'जिवंत' पाणीसाठा २४.०३ टक्के आहे, तर गेल्यावर्षी १८ जून २०२५ रोजी हा साठा ३२.३८ टक्के नोंदवला गेला होता. जलसंपदा विभागाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, साठ्याची ही आकडेवारी काहीशी दिशाभूल करणारी असू शकते. कारण, २०२५ मध्ये नैऋत्य मान्सून महाराष्ट्रात नेहमीपेक्षा लवकर म्हणजेच २८ मे रोजीच दाखल झाला होता. तसेच जूनच्या मध्यापर्यंत किनारपट्टी, पश्चिम महाराष्ट्र आणि मध्य महाराष्ट्राच्या काही भागांत मुसळधार पाऊस झाला होता.

# 'उबाठाचा अभिषेक बॅनर्जी म्हणजे आदित्य ठाकरे, त्यांना हेल्मेट पाठवणार'

## ऑपरेशन टायगरनंतर नितेश राणेंचा घणाघाती वार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)





**दिल्ली** – दिल्लीमध्ये झालेल्या 'ऑपरेशन टायगर' अंतर्गत शिवसेना ठाकरे गटाचे ६ खासदार फुटल्यानंतर महाराष्ट्रातील राजकीय वातावरण कमालीचे तापले आहे. या मोठ्या राजकीय भूकंपावर भाजप नेते आणि मंत्री नितेश राणे यांनी सिंधुदुर्गातून पत्रकार परिषद घेत उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांच्यावर अत्यंत बोचरी आणि घणाघाती टीका केली आहे. 'ठाकरे गट हा काँग्रेसमध्ये विलीन होणार होता, म्हणूनच या ६ खासदारांनी बाळासाहेबांचे विचार वाचवण्यासाठी एकनाथ शिंदेंचे नेतृत्व स्वीकारले,' असा खळबळजनक दावा नितेश राणे यांनी केला आहे. तसेच त्यांनी आदित्य ठाकरे यांची तुलना थेट पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेसचे नेते अभिषेक बॅनर्जी यांच्याशी केली आहे.

या संपूर्ण प्रकरणावर बोलताना नितेश राणे यांनी आपली आक्रमक भूमिका मांडली. 'ऑपरेशन टायगर झालं त्याबाबत शिवसेनेच्या प्रमुख नेत्यांनी माहिती दिली आहे. त्यावर तुम्ही तुडवा, जुडवा, बुडवा काही बोला. पण याला जबाबदार कोण याचा विचार करा. जसं तृणमूल काँग्रेसमध्ये एक अभिषेक बॅनर्जी आहे, तसा उबाठाच्या अभिषेक बॅनर्जीला का प्रश्न विचारत नाही? आदित्य ठाकरे यांना विचारा, तू असताना तुझे खासदार का सोडून गेले? तृणमूलचा अभिषेक बॅनर्जी उबाठामध्ये आदित्य ठाकरे. जसं अभिषेक बॅनर्जीला पश्चिम बंगालमध्ये हेल्मेट घालून फिरण्याची वेळ आली, तसं एक हेल्मेट आदित्य ठाकरेंना पाठवणार. महाराष्ट्रामध्ये फिरताना चुकून अंडी आणि चपला आल्या, तर हेल्मेट हवं. पण त्यासाठी पेंग्विन हेल्मेट घालून कसा दिसेल हे वेगळं संशोधन आहे, अशी टीका नितेश राणे यांनी केली.

आदित्य ठाकरेंना काँग्रेसचा राष्ट्रीय सरचिटणीस बनवण्याचा प्रस्ताव नितेश राणे पुढे म्हणाले की, उद्धव ठाकरेंचा पक्ष ज्याला आपण उबाठा म्हणतो, तो काँग्रेसमध्ये विलीन होणार होता. म्हणून त्या सहा खासदारांनी एकनाथ शिंदे यांचं नेतृत्व स्वीकारलं. बाळासाहेबांचे विचार हे काँग्रेसच्या विरोधात विचार होते. माझ्या शिवसेनेची कधीही काँग्रेस होऊ देणार नाही, नाहीतर दुकान बंद करेन, असं बोलणारे आमचे हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारला तिलांजली देऊन उद्धव ठाकरे पक्ष काँग्रेसमध्ये विलीन करणार होते. आदित्य ठाकरे आणि राहुल गांधी यांच्यात बैठका झाल्या होत्या.

# पहिली वातानुकूलित डबलडेकर बस अखेर रस्त्यावर

## चार्जिंग सुविधेच्या समस्येनंतर पर्यायी व्यवस्था, सर्कल-भाईदरपाडा मार्गावर धावली

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**ठाणे** – महाराष्ट्र दिनानिमित्त लोकार्पण करण्यात आलेली ठाणे परिवहन सेवेची पहिली वातानुकूलित इलेक्ट्रिक डबलडेकर बस अखेर ठाणेकरांच्या सेवेत दाखल झाली आहे. चार्जिंग स्टेशनच्या तांत्रिक अडचणीमुळे जवळपास महिनाभर घोडबंदर रोडवरील आनंदनगर आगारात निष्क्रिय अवस्थेत उभी असलेली ही बस महापालिकेच्या हस्तक्षेपानंतर पर्यायी व्यवस्था उपलब्ध झाल्याने आता नियमितपणे रस्त्यावर धावू लागली आहे.

कोपरी येथील विद्यमान चार्जिंग स्टेशनवर इतर इलेक्ट्रिक बस चार्ज होत असल्या, तरी डबलडेकर बसची प्रणाली वेगळी असल्याने तेथे चार्जिंग शक्य नव्हते. डबलडेकर बससाठी पर्यायी चार्जिंग सुविधा उपलब्ध करण्याबाबत त्यांनी परिवहन अधिकाऱ्यांना आवश्यक उपाययोजना तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.

भविष्यात एकूण दहा बस दाखल होणार महापौरांच्या निर्देशानंतर परिवहन प्रशासनाने चार्जिंगची पर्यायी व्यवस्था उभी केल्यानंतर अखेर १५ जूनपासून ही बस नियमित सेवेत दाखल झाली. दरम्यान, ठाणे परिवहन सेवेच्या ताफ्यात लवकरच आणखी एक वातानुकूलित इलेक्ट्रिक डबलडेकर बस दाखल होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. पहिल्या टप्प्यात दोन डबलडेकर बस शहरात धावणार असून, भविष्यात अशा एकूण दहा बस ताफ्यात समाविष्ट करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

प्रवाशांसाठी आकर्षणाचा विषय सध्या बस २२ नंबर सर्कल ते भाईदरपाडा या मार्गावर धावत असून सकाळी ८ ते दुपारी १२ आणि दुपारी २ ते सायंकाळी ६ या वेळेत सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. दुमजली रचना, वातानुकूलित सुविधा, प्रशस्त आसनव्यवस्था आणि पर्यावरणपूरक तंत्रज्ञानामुळे या बसला प्रवाशांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. विशेषतः घोडबंदर रोड परिसरातील प्रवाशांसाठी ही सेवा आकर्षणाचा विषय ठरत असून अनेक नागरिक डबलडेकर बसमधून प्रवासाचा अनुभव घेण्यासाठी उत्सुक असल्याचे दिसून येत आहे.

# टीईटी परीक्षार्थ्यांसाठी महत्त्वाची बातमी : परीक्षा केंद्रावर लागू झाले नवे नियम

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई –** महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा यंदा अधिक कडक नियमांसह घेतली जाणार आहे. परीक्षेदरम्यान गैरप्रकार टाळण्यासाठी राज्य परीक्षा परिषदेने अनेक महत्त्वाचे बदल केले आहेत. त्यामुळे परीक्षार्थींनी परीक्षा केंद्रावर जाताना नवीन नियमांची माहिती घेणे आवश्यक ठरणार आहे. हे आहेत नवीन नियम यंदाच्या परीक्षेत उमेदवारांना बुरखा, मास्क, टोपी, दुपट्टा किंवा चेहरा झाकणारी कोणतीही वस्तू घालून परीक्षा केंद्रात प्रवेश करता येणार नाही. परीक्षा केंद्रावरील सीसीटीव्ही यंत्रणा आणि चेहरा ओळख तंत्रज्ञानाद्वारे उमेदवारांची पडताळणी केली जाणार असल्याने चेहरा स्पष्ट दिसणे आवश्यक राहणार आहे. परीक्षार्थींनी आधार कार्ड, पॅन कार्ड, वाहन परवाना किंवा मतदान ओळखपत्र यापैकी कोणतेही एक छायाचित्र असलेले मूळ ओळखपत्र सोबत आणणे बंधनकारक करण्यात आले आहे. मूळ ओळखपत्र नसल्यास परीक्षा केंद्रात प्रवेश दिला जाणार नाही. परीक्षा केंद्रावर उमेदवारांची बायोमेट्रिक नोंदणी, फेस रिकग्निशन आणि मेटल डिटेक्टरद्वारे तपासणी केली जाणार आहे. संशयित उमेदवारांची आधार पडताळणीही केली जाऊ शकते. दुसऱ्या व्यक्तीने परीक्षेला बसल्याचे आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचे परिषदेकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.एम.डी.सैंदाणे, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४९०/२०२६ ने.ता.०४/०८/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती उषा जगदिशराव कारावडीया, वय अं.७० वर्ष, धंदा-गृहिणी, २) मिलन जगदिश कारावडीया, वय अं.३९ वर्ष, धंदा- व्यवसाय, ३) कौशल जगदिश कारावडीया, वय अं.३२ वर्ष, धंदा- व्यवसाय, क्र.१ ते ३ रा.राजुराबाजार, ता.वरुड, ४) सौ.भाग्यश्री अमन खिलोसिया, वय अं.३५ वर्ष, धंदा-गृहिणी, रा.आर्वी, ता.आर्वी, जि.वर्धा

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत जगदिश जयंतीलाल कारावडीया, रा.राजुराबाजार, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०४/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१८/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.एम.डी.सैंदाणे, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४८७/२०२६ ने.ता.०४/०८/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती सुमनबाई परबत उर्फ पर्वतराव भुजाडे, वय अं.८५ वर्ष, धंदा-घरकाम, २) सतीश पर्वतराव भुजाडे, वय अं.५५ वर्ष, धंदा- शेती, क्र.१ व २ रा.वाठोडा (चांदस), ता.वरुड, ३) सौ.मंदा दिलीप उघडे, वय अं.५९ वर्ष, धंदा-घरकाम, रा.टेंभुरखेडा, ता.वरुड, ४) सौ.नंदा बंडु देशमुख, वय अं.५७ वर्ष, धंदा-घरकाम, रा.आष्टा, ता.मुलताई, ५) सौ.वंदना मनराज देशमुख, वय अं.५६ वर्ष, धंदा- घरकाम, रा.चांदस, ता.वरुड, ६) सौ.वनिता अशोक खांडवे, वय अं.५२ वर्ष, धंदा-घरकाम, रा.चारुड (तिवरखेड), ता.जि.बैतुल

**... विरुध्द ... गैरअर्जदार :- निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत पर्वतराव जागोजी भुजाडे, रा.वाठोडा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०४/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **१८/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्रीमती.जे.एस.ठाकरे, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४५८/२०२६ ने.ता.२७/०७/२०२६**

**अर्जदार :-** १) हसीन बी वकिल दिवाण, वय अं.४२ वर्ष, धंदा-गृहिणी, मु.पो.आमनेर, ता.वरुड, जि.अमरावती, २) शबाना गफ्फार मंसूरी, वय अं.४१ वर्ष, धंदा- गृहिणी, ३) रुबीना फिरोज मंसूरी, वय अं.३८ वर्ष, धंदा- गृहिणी, क्र.२ व ३ रा.अंबाडा, ता.नांदनवाडी, जि.पांढुर्णा

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत शेख बशीर शेख अमीर सौदागर व मयत शहीदाबी शेख बशीर, रा.बेनोडा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२७/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१८/०५/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

### जाहीर नोटीस

## तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय

**क्र.प्रस्तु-१/कावी-३१३/२५-२६ दि.१९/०६/२६**

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **ईश्वर महादेवराव पाटणे, रा.सुरळी, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **ग्रामपंचायत सुरळी, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **आई नामे पार्वताबाई महादेवराव पाटणे, रा.सुरळी, ता.वरुड, जि.अमरावती, यांचा मृत्यू दि.२५/११/२००९** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी **१९/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार**
**वरुड**

# भावनिकदृष्ट्या चुकीचा निर्णय, पण राजकीयदृष्ट्या बरोबर : ओमराजे निंबाळकर

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई –** उबाठा गटात झालेल्या बंडानंतर संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागून राहिलेले धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी अखेर आपले मौन सोडले आहे. ‘भावनिकदृष्ट्या विचार केल्यास पक्ष सोडण्याचा निर्णय चुकीचा वाटतो, पण राजकीयदृष्ट्या आणि मतदारसंघाच्या हितासाठी तोच बरोबर आहे,‘ अशी कबुली देत ओमराजे यांनी उबाठा पक्षनेतृत्वाच्या कार्यपद्धतीवर आक्षेप नोंदवले. आपण सध्या पुण्यात असून २० जून रोजी वडिलांच्या (पवनराजे निंबाळकर) हत्येच्या खटल्याचा निकाल लागल्यानंतर, धाराशिवमध्ये जाऊन कार्यकर्त्यांशी सविस्तर चर्चा करू आणि त्यानंतरच आपला अंतिम निर्णय जाहीर करू, असे त्यांनी



स्पष्ट केले.आपल्या संभाव्य पक्षांतराच्या मागे कोट्यवधी रुपयांचे आर्थिक व्यवहार झाल्याची चर्चा ओमराजे यांनी फेटाळून लावली. ते म्हणाले, ‘पैसे घेतल्याची चर्चा धादांत खोटी आणि तथ्यहीन आहे. माझ्यासाठी सत्ता आणि पैसा नेहमीच गौण राहिले आहेत. हा निर्णय पैशांसाठी नाही, तर मतदारसंघातील विकासकामे आणि माझ्याकडे अपेक्षेने पाहणाऱ्या मतदारांसाठी आहे. जर हीच स्थिती राहिली, तर भविष्यात माझ्या स्वतःच्या राजकीय अस्तित्वालाच मोठा धोका निर्माण होईल. अशा वेळी लोकप्रतिनिधी म्हणून मी काय करावे?‘ असा उद्विग्न सवाल त्यांनी उपस्थित केला. महायुती आणि उबाठा पक्षनेतृत्वामधील स्पष्ट फरक सांगताना ओमराजे म्हणाले, ‘मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे इतके संख्याबळ असतानाही ते शांत बसलेले नाहीत.

### जाहीर नोटीस

## तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय

**क्र.प्रस्तु-१/कावी-३११/२५-२६ दि.१९/०६/२६**

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **ईश्वर महादेवराव पाटणे, रा.सुरळी, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **ग्रामपंचायत सुरळी, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **वडील नामे महादेवरा लक्ष्मणराव पाटणे, रा.सुरळी, ता.वरुड, जि.अमरावती, यांचा मृत्यू दि.०६/१०/१९८०** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी **१९/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार**
**वरुड**

### जाहीर नोटीस

## तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय

**क्र.प्रस्तु-१/कावी-३१२/२५-२६ दि.१९/०६/२६**

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **ईश्वर महादेवराव पाटणे, रा.सुरळी, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **ग्रामपंचायत सुरळी, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **भाऊ नामे वासुदेवराव महादेवरा पाटणे, रा.सुरळी, ता.वरुड, जि.अमरावती, यांचा मृत्यू दि.०८/०१/२०२०** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी **१९/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार**
**वरुड**

### जाहीर नोटीस

## तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय

**क्र.प्रस्तु-१/कावी-३०६/२५-२६ दि.१६/०६/२६**

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **प्राची प्रदिपराव धुर्वे, रा.फत्तेपूर, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **ग्रामपंचायत फत्तेपूर, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **आई नामे संगीता प्रदिपराव धुर्वे, रा.फत्तेपूर, ता.वरुड, जि.अमरावती, यांचा मृत्यू दि.०४/१०/२०२१** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी **१६/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार**
**वरुड**

### जाहीर नोटीस

## तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय

**क्र.प्रस्तु-१/कावी-३१४/२५-२६ दि.१९/०६/२६**

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **रमेश रतनलाल धुर्वे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **नगर परिषद वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **स्वत: नामे रमेश रतनलाल धुर्वे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती, यांचा जन्म दि.०५/०३/१९८८** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी **१९/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार**
**वरुड**

## थोडक्यात

### विधान परिषद निवडणुकांना उत्स्फूर्त प्रतिसाद



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – राज्यातील विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकांसाठी गुरुवारी झालेल्या मतदानाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. नाशिकमध्ये ९९.८४ टक्के, नांदेडमध्ये ९९.७८ टक्के, जळगावमध्ये ९७.७८ टक्के, तर छत्रपती संभाजीनगर–जालना मतदारसंघात ९८.९० टक्के तर सातारा–सांगली विधान परिषदेसाठी तब्बल ९९.८९ टक्के मतदानाची नोंद झाली. आता २२ जून रोजी होणाऱ्या मतमोजणीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.नाशिक मतदारसंघात ९९.८४ टक्के मतदान; ६१८ मतदारांनी बजावला हक्क, २२ जून रोजी मतमोजणी नाशिक : विधान परिषदेच्या नाशिक स्थानिक प्राधिकारी मतदारसंघासाठी गुरुवारी पार पडलेल्या निवडणुकीत ९९.८४ टक्के मतदानाची नोंद झाली.

## तंबाखूजन्य पदार्थांवर बंदी आणि कडक कारवाई सुरु झाल्याने

# शौकीनांमध्ये प्रचंड अस्वस्थता : जे मिळेल त्यावर सुरु आहे 'टाईमपास'

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – राज्यात तंबाखूजन्य पदार्थांवर बंदी आणि कडक कारवाई सुरु झाल्याने गुटखा, खर्रा व तंबाखूचे शौकिन अडचणीत सापडले आहेत. अनेक ठिकाणी गुटखा आणि खर्राची विक्री बंद झाल्याने व्यसनाधीन व्यक्तींना हे पदार्थ मिळणे कठीण झाले आहे. परिणामी काही जण जास्त किंमत मोजुन काळ्या बाजारातुन खरेदी करत असल्याचे दिसून येत आहे.

आरोग्य विभागाच्या मते, गुटखा आणि तंबाखूमुळे कर्करोगासह अनेक गंभीर आजार होतात. त्यामुळे सरकारने जनतेच्या आरोग्याच्या दृष्टीने कठोर पावले उचलली आहेत. मात्र दुसरीकडे या पदार्थांचे सेवन करणाऱ्या लोकांमध्ये अस्वस्थता वाढल्याचे चित्र आहे.

तज्ज्ञांच्या मते, ही परिस्थिती व्यसनमुक्तीसाठी चांगली संधी असून नागरिकांनी तंबाखूजन्य पदार्थांपासून दूर राहून आरोग्यदायी जीवनशैली स्विकारावी. सरकारच्या या निर्णयाचे अनेक सामाजिक संघटना आणि आरोग्य तज्ज्ञांनी स्वागत केले आहे.



राज्यात तंबाखूजन्य पदार्थांवर कडक कारवाई सुरु असून गुटखा, खर्रा आणि इतर तंबाखूयुक्त पदार्थांच्या विक्रीवर बंदी घालण्यात आल्याने या पदार्थांचे सेवन करणाऱ्या शौकिनांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. अचानक उपलब्धता कमी झाल्याने अनेकांना त्यांच्या दैनंदिन सवयींमध्ये बदल करावा लागत आहे.

काही नागरिकांनी बंदीमुळे काळाबाजार वाढण्याची शक्यता व्यक्त केली असून, तर काहींनी आरोग्याच्या दृष्टीने हा निर्णय योग्य असल्याचे मत मांडले आहे. प्रशासनाकडून विविध ठिकाणी छापेमारी करून अवैध साठा जप्त करण्यात येत असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई केली जात आहे. वैद्यकीय तज्ज्ञांच्या मते, गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांमुळे कर्करोगासह अनेक गंभीर आजारांचा धोका वाढतो. त्यामुळे या पदार्थांवरील निर्बंध हे जनतेच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, बंदीमुळे तंबाखू, गुटखा व खर्रा सेवन करणाऱ्यांना पर्याय शोधावे लागत असून या निर्णयावर समाजातून संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत.

गुटखा व खर्रावर बंदी आणि कडक कारवाई सुरू असताना तंबाखू व चुन्याच्या मागणीत मोठी वाढ झाल्याचे चित्र दिसून येत आहे. अनेक ठिकाणी तंबाखू आणि चुना खरेदीसाठी शौकिनांची गर्दी होत असून विक्रेत्यांकडेही मागणी वाढली आहे. गुटखा आणि खर्रा सहज उपलब्ध होत नसल्याने अनेक व्यसनाधीन व्यक्ती तंबाखू व चुन्याकडे वळल्याचे दिसून येत आहे. परिणामी काही भागात या वस्तूंची विक्री वाढली असून क्षणोक्षणी मागणी वाढत असल्याचे विक्रेत्यांचे म्हणणे आहे.

दरम्यान, आरोग्य तज्ज्ञांनी तंबाखू व चुन्याचे सेवनही आरोग्यासाठी घातक असल्याचे सांगितले आहे. तोंडाचा कर्करोग, हिरड्यांचे आजार आणि इतर गंभीर आरोग्य समस्यांचा धोका यामुळे वाढू शकतो. त्यामुळे नागरिकांनी या पदार्थांपासून दूर राहून व्यसनमुक्तीचा मार्ग स्वीकारावा, असे आवाहन करण्यात येत आहे. गुटखा बंदीनंतर निर्माण झालेल्या परिस्थितीत तंबाखू व चुन्याची वाढती मागणी हा चर्चेचा विषय ठरत असून प्रशासनाचे याकडेही लक्ष लागले आहे.



"तंबाखू, गुटखा आणि खर्रावरील कारवाईच्या पार्श्वभूमीवर प्रसिद्ध व्यसनमुक्ती तज्ज्ञ तथा आयुर्वेदाचार्य डॉ.चरण सोनारे यांनी नागरिकांना व्यसनमुक्तीचा मार्ग स्वीकारण्याचे आवाहन केले आहे. 'तंबाखू, गुटखा आणि खर्रा ही केवळ सवय नसून एक गंभीर व्यसन आहे. अनेकांना सकाळी तंबाखू घेतल्याशिवाय शौच होत नाही किंवा कामात मन लागत नाही असे वाटते, परंतु हे शरीराचे नव्हे तर मनाचे आणि निकोटीनवरील अवलंबित्वाचे लक्षण आहे. योग्य समुपदेशन, संतुलित आहार, नियमित व्यायाम आणि दृढ इच्छाशक्तीच्या बळावर हे व्यसन सहज सोडता येऊ शकते. 'तंबाखूमुळे तोंडाचा कर्करोग, हृदयविकार, उच्च रक्तदाब आणि श्वसनाचे अनेक आजार होण्याचा धोका वाढतो. त्यामुळे प्रशासनाच्या कारवाईकडे केवळ बंदी म्हणून न पाहता, आरोग्यदायी जीवनाकडे वाटचाल करण्याची संधी म्हणुन पाहिले पाहिजे' 'व्यसनापासून दूर राहणे हीच खरी आरोग्याची गुरुकिल्ली आहे. व्यसनमुक्त समाज घडविण्यासाठी प्रत्येकाने स्वतःपासून सुरुवात करणे गरजेचे आहे.'

"आरोग्य तज्ज्ञ मात्र सांगतात की, तंबाखूशिवायही शरीराची नैसर्गिक पचनक्रिया व्यवस्थित होऊ शकते. पुरेसे पाणी पिणे, नियमित व्यायाम, संतुलित आहार आणि ठराविक वेळेची सवय यामुळे अशा समस्या कमी होऊ शकतात. तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन तोंडाचा कर्करोग, हृदयविकार आणि इतर गंभीर आजारांना कारणीभूत ठरू शकते. त्यामुळे नागरिकांनी व्यसनमुक्तीकडे पावले उचलावीत, असे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात येत आहे.



"गुटखा व खर्रावरील कारवाईमुळे खर्रा शौकिनांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. 'सकाळचा चहा असो, शेतातील काम असो किंवा मित्रांच्या गप्पा, खर्राशिवाय कोणतेच काम होत नाही,' अशी भावना अनेक शौकिनांनी व्यक्त केली. खर्रा सहज उपलब्ध होत नसल्याने काहीजण तंबाखु व चुन्याकडे वळले असून त्यांची मागणी वाढल्याचे दिसून येत आहे. गावातील चौक, पानटपऱ्या आणि कट्ट्यांवर सध्या खर्रा हा चर्चेचा मुख्य विषय बनला आहे. काही शौकिन तर विनोदाने, 'खर्रा नाही तर कामात मन लागत नाही', असे म्हणताना दिसत आहेत. मात्र आरोग्य तज्ज्ञांच्या मते, तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन आरोग्यासाठी हानिकारक असून ही सवय सोडण्यासाठी ही एक चांगली संधी आहे.





"तंबाखूचे व्यसन इतके घट्ट झाले आहे की, अनेकजण सकाळी तंबाखू खाल्ल्याशिवाय शौचास होत नसल्याची कबुली देतात. वैद्यकीय तज्ज्ञांच्या मते, हे तंबाखूची शारीरिक गरज नसून दीर्घकाळ जडलेल्या सवयीचा आणि निकोटीनवरील अवलंबित्वाचा परिणाम असू शकतो. गुटखा, खर्रा आणि तंबाखूच्या उपलब्धतेवर निर्बंध आल्याने काही व्यसनाधीन व्यक्तींना अस्वस्थता, चिडचिड आणि दैनंदिन सवयींमध्ये अडचणी जाणवत असल्याचे दिसून येत आहे. 'सकाळी तंबाखु खाल्ल्याशिवाय दिवसाची सुरुवात होत नाही', अशी प्रतिक्रिया काही नागरिकांनी दिली.

# विधान परिषद निवडणुकीत ९९.०२ टक्के मतदान : २२ जूनला मतमोजणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – बिनविरोध निवडणुकीमुळे चर्चेत असलेल्या विधान परिषदेच्या राज्यातील ११ स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी गुरुवारी शांततेत मतदान पार पडले.

सकाळी ८ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत झालेल्या मतदानात एकूण ७ हजार ४७ मतदारांपैकी ६ हजार ९७८ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. त्यामुळे राज्यभरात सरासरी ९९.०२ टक्के इतके मतदान नोंदविण्यात आले. या निवडणुकीची मतमोजणी २२ जूनला होणार आहे. भारत निवडणूक आयोगाने विधान परिषदेच्या १७ स्थानिक प्राधिकारी मतदारसंघासाठी १८ मे रोजी निवडणूक जाहीर केली होती. या १७ जागांमध्ये नागपूर स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीचा समावेश आहे.



सहा मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याने पुणे, ठाणे, सिंधुदुर्ग–रत्नागिरी–रायगड, यवतमाळ, वर्धा–चंद्रपूर–गडचिरोली, अहिल्यानगर या ठिकाणी महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून आले. त्यामुळे आज ११ जागांसाठी मतदान पार पडले.

या निवडणुकीत भंडारा–गोंदिया स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात सर्वच्या सर्व म्हणजे ४५७ मतदारांनी मतदान केल्याने १०० टक्के मतदानाची नोंद झाली. तर अमरावती मतदारसंघात ४५१ पैकी ४२७ मतदारांनी मतदान करत ९४.६८ टक्के मतदान झाले, जे सर्वात कमी राहिले.

# टेलिग्राम बंदीवरून राहुल गांधी यांचा मोदींवर निशाणा

## पेपर लीक माफियांवर कारवाई करा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – केंद्र सरकारने टेलिग्राम ॲपवर तात्पुरती बंदी घातल्यानंतर काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी बुधवारी सरकारवर जोरदार टीका केली आहे. सरकारची ही 'नवीन युक्ती' म्हणजे चोर सोडून संन्याशाला फाशी देण्यासारखी किंवा चोराला पकडण्याऐवजी पीडिताच्याच घराला कुलूप लावण्यासारखी आहे, असा टोला राहुल गांधी यांनी लगावला आहे. नीट–यूजी २०२६च्या पुनर्रचनेच्या पार्श्वभूमीवर, सरकारने ॲपवर बंदी घालण्याचे आदेश दिल्यानंतर मंगळवारी गुगलने आणि त्यानंतर ॲपलच्या ॲप स्टोअरनेही टेलिग्राम आपल्या प्लॅटफॉर्मवरून हटवले आहे.



विद्यार्थ्यांचे नुकसान का? राहुल गांधींचा सवाल राहुल गांधी यांनी एक्सवर हिंदीत पोस्ट करत सरकारला धारेवर धरले. ते म्हणाले, 'टेलिग्राम बंदी' ही पेपर लीक रोखण्यासाठी मोदी सरकारची नवी युक्ती आहे. म्हणजेच चोराला पकडण्याऐवजी पीडिताच्याच घराला कुलूप ठोकणे. देशातील लाखो विद्यार्थी वर्षानुवर्षे टेलिग्रामवर अभ्यास करत आहेत – तेथे त्यांना नोट्स मिळतात, टेस्ट सीरिज असतात, चर्चा आणि परीक्षेची तयारी चालते.

'एनटीए'चे स्पष्टीकरण २१ जून रोजी होणाऱ्या नीट–यूजी पुनर्रचनेत गैरप्रकार आणि अफवा रोखण्यासाठी टेलिग्रामवर तात्पुरती बंदी घालण्यात आल्याचे राष्ट्रीय परीक्षा संस्थेने (एनटीए) म्हटले आहे. २२ जूनपर्यंत टेलिग्रामवर लावण्यात आलेली ही बंदी परीक्षेदरम्यान कोणताही गैरप्रकार होऊ नये यासाठी उचललेले पाऊल आहे.

### मुंबई विमानतळा बाहेरील 'मातम' व्हिडीओवरून नवा वाद

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या टर्मिनल २ च्या निर्गमन कक्षाबाहेर काही व्यक्तींनी जाहीरपणे 'मातम' केल्याचा व्हिडीओ समाजमाध्यमांवर प्रसारित झाल्यानंतर नवा वाद निर्माण झाला आहे. शिया मुस्लिमांकडून मोहरम महिन्यानिमित्त करण्यात आलेल्या या शोकविधीवर हिंदू संघटनांनी तीव्र आक्षेप घेतला असून सार्वजनिक जागेचा गैरवापर केल्याचा आरोप केला आहे. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी करत बजरंग दलाने पोलीस आयुक्तांना पत्र लिहिले आहे.

